उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON
(NAAC ACCREDITED)
P. B. NO. : 80, UMAVI NAGAR, JALGAON


उमवि/५-ए/ब. / 06 /२००५ दि.५/१२/२००५

प्रति,
मा. अध्यक्ष,
जळगाव जिल्हा मेडिसीन डिलर्स सोसायटी,
११५, पुष्पलता बेंडाळे चौक,
जळगाव.

**विषय:- शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पासून नविन महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाबाबत..**

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. टीईएम २००५/(३२९/०५)/तांशि-१, दि. २९ जून,२००५
२) ए.आय.सी.टी.ई. चे पत्र क्र. ०६/०७/एमएस/फॉर्म/२००४/०५७, दि. २४ जून, २००५
३) विद्यापीठ पत्र क्र. उमवि/५-ए/६०७६/२००५, दि. १९/७/२००५

महोदय,

महाराष्ट्र शासनाचे व ए.आय.सी.टी.ई. चे संदर्भिय पत्र क्र.१ व २ च्या पत्रात नमूद केलेल्या अटीच्या अधिन राहून आपल्या संस्थेस ममुराबाद, जि. जळगाव येथे फार्मसी विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरू करण्यास शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून नवीन महाविद्यालयाच्या संदर्भात तपासणी करून अहवाल विद्यापीठास सादर करण्यासाठी, संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती. सदरहू समितीने सादर केलेल्या अहवालास मा. कुलगुरू महोदयांनी विद्वा परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने मला प्राप्त झालेल्या आदेशावरून आपणास कळविण्यात येते कि, सोबत जोडलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता सदर पत्र प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या शर्तीवर आपल्या संस्थेस ममुराबाद, जि. जळगाव येथे फार्मसी विद्याशाखेचे बी. फार्मसी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन महाविद्यालय शै. वर्ष २००५-०६ पासून सुरू करण्यास महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ च्या कलम ८३ (४) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर मान्यता एका वर्षा करिता राहिल व सदर संलग्नतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील. याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

Principal
JZMDS
College of Pharmacy
Mamurabad, Tal.& Dist.Jalgaon

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON
( NAAC ACCREDITED ★ ★ ★ ★ )
P. B. NO. : 80, UMAVI NAGAR, JALGAON - 425 001 (M.S.)

शासनाच्या संदर्भिय पत्र क्र. १ च्या पत्रात नमूद केलेल्या बाबींची तसेच संदर्भ पत्र क्र. २ वरिल पत्रान्वये ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली व विद्यापीठाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियमांचे/आदेशांचे पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

तरी उपरोक्त अटींची व ए.आय.सी.टी.ई.ने नमूद केलेल्या अटींची तसेच अहवालात नमूद केलेल्या अटींची/त्रुटींची पूर्तता तीन महिन्यांच्या आत पूर्ण करून अटीपूर्तता अहवाल आवश्यक त्या दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रतीसह फाईलमध्ये या कार्यालयास सादर करण्यात यावा.

म. कळावे,

आपला विश्वासू,

उप कुलसचिव
(संलग्नता)

सोबत:- स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाची झेरॉक्स प्रत.

प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर:-

१) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालीका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई -१.
२) मा. सह संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, सामनगाव रोड, पो.बॉ.नं. २१९, नवीन शासकिय तंत्रनिकेतन आवार, नाशिक रोड, नाशिक.
३) मा. परीक्षा नियंत्रक, उ.म.वि., जळगाव.
४) मा. उप कुलसचिव, प्रवेश व पात्रता, उ.म.वि., जळगाव.

Principal
JZMDS
College of Pharmacy
Mamurabad, Tal.& Dist.Jalgaon